① Dr. Rajabhau Chavan (Hist

* Dr. Rajabhau Chavan (History) ③ (11)



Impact Factor – 6.261 ISSN – 2348-7143
INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-research Journal
PEER REFREED & INDEXED JOURNAL
**Vol II**

**12 January 2019**
SPECIAL ISSUE – 92

# भारतीय इतिहासातील स्त्रीयांचे योगदान

**Chief Editor -**
**Dr. Dhanraj T. Dhangar,**
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

**Prof. Gangane R.V.**
Assit. Prof. Dept. of History,
Vasant Mahavidalaya , Kaij, Dist. Beed

**Dr. M.S. Kamble**
Assit. Prof. Dept. of History,
Vasant Mahavidalaya , Kaij, Dist. Beed

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS
For Details Visit To : www.researchjourney.net
© All rights reserved with the authors & publisher
Price : Rs. 400/-

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | 12 January 2019 | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) –0.676 | UGC Approved No. 40705
Special Issue 92 , भारतीय इतिहासातील स्त्रियांचे योगदान

# Index


| | | | |
|---|---|---|---|
| 1. | आई जिजाऊ माँ साहेब | प्रा.डॉ.कंधारे विश्वास | 7 |
| 2. | मराठवाडयातील कामगार चळवळतील कॉ. करुणा चौधरी यांचे कार्य | प्रा. डॉ. संतोष पहारे | 9 |
| 3. | वैदिकसंस्कृतीकालीनस्त्रीयांचा दर्जा व विवाह संस्था | प्रा.डॉ.सुरेश कातळे | 11 |
| 4. | भारतीय क्रांतीकारी चळवळीतील स्त्रियांची भूमिका | प्रा.केशव अंबादास लहाने | 13 |
| 5. | 1857 च्या उठावातील राणी लक्ष्मीबाईचे योगदान | प्रा. डॉ. घोलप कमलाकर गोरख | 16 |
| 6. | महर्षि विठ्ठल रामजी शिंदे यांच्या विचारातील स्त्री-पुरुष समानता | डॉ.मनिषा बंडुराव रोकडे | 19 |
| 7. | मराठ्यांच्या इतिहासातील आद्य कर्तृत्वान स्त्री- उमाबाई भोसले | प्रा.डॉ. सावंत के.डी. | 20 |
| 8. | मराठ्यांच्या इतिहासातील यशुबाईचे कार्य | प्रा. चव्हाण आर.ए. | 22 |
| 9. | हैद्राबाद मुक्ती संग्रामातील महिलांचे योगदान | प्रा. मिलिंद व्यंकटी घाडगे | 24 |
| 10. | 19 व्या शतकाच्या स्त्री शिक्षणातील पंडिता रमाबाई यांची भूमिका व कार्य | प्रा. वटाणे कल्याण राजेंद्र | 26 |
| 11. | मध्ययुगीन कालीन एक प्रभावी महिलाः रझिया सुलताना | डॉ. शेख हुसैन इमाम | 28 |
| 12. | भारतीय स्त्री सुधारणा चळवळ | प्रा.प्रमोद चव्हाण | 30 |
| 13. | आधुनिक महाराष्ट्राच्या राजकारणात महिलांचा सहभाग व भूमिका | डॉ. प्रशांत अ. साबळे | 32 |
| 14. | सत्यशोधक चळवळ आणि स्त्रियांचे कार्य एक अवलोकन | प्रा. डॉ. रामभाऊ मुटकुळे | 35 |
| 15. | सावित्राबाई फुले यांचे शैक्षणिक कार्य व विचार एक अभ्यास | डॉ.पठाण झेड. ऐ. | 37 |
| 16. | जानकीबाई आपटे यांचे भारतीय स्वातंत्र्य आंदोलनातील योगदान | प्रा. डॉ.गट्टी जी.व्ही., डॉ.नाईक एन.डी. | 40 |
| 17. | 19 व्या शतकांतील स्त्रीवादी पत्रकारितेचा शोध | डॉ.कुलकर्णी भालचंद्र गोंविदराव | 42 |
| 18. | स्त्री सबलीकरणा संदर्भात ताराबाई शिंदे चे योगदान | डॉ. राजेश करपे , प्रा. शेडगे के. डी. | 45 |
| 19. | भारतीय स्वातंत्र्यलढा आणि भारतीय स्त्रीयांची भूमिका | प्रा.डॉ.लक्ष्मीकांत जिरेवाड | 47 |
| 20. | मराठेशाहीच्या इतिहासातील महान व्यक्तिमत्व : राष्ट्रमाता जिजाबाई | सहा. प्रा. कलाणे कांतराव किसनराव | 49 |
| 21. | शिवकालीन स्त्रियांचे कार्य : महाराणी जिजाबाई | श्रीमती सरवदे वर्षा तात्यासाहेब | 52 |
| 22. | महाराणी येसुबाई | प्रा. पावडे खोब्राजी वामनराव | 54 |
| 23. | स्वराज्यहिताला सर्वोच्च प्राधान्य देणाऱ्या महाराणी येसूबाई | प्रा. रणदिवे डी. एम. | 57 |
| 24. | सत्यस्वरुप सगुणाबाई क्षीरसागर यांचे सत्यशोधक चळवळीतील योगदान - एक अभ्यास | सुरेखा जावळे | 59 |
| 25. | संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात महिलांचे कार्य - एक आढावा | प्रा. डॉ. शारदा कदम | 61 |
| 26. | हैद्राबाद मुक्ती संग्रामातील स्त्रीयाचे कार्य | प्रा. शिंदे हरिदास अर्जुन | 63 |
| 27. | सत्यशोधक चळवळ आणि स्त्री सुधारणा - एक आढावा | प्राचार्य डॉ. बबन पवार | 65 |

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) –0.676 | 12 January 2019 | UGC Approved No. 40705
Special Issue 92 , भारतीय इतिहासातील स्त्रियांचे योगदान

# मराठ्यांच्या इतिहासातील यशुबाईचे कार्य

**प्रा. चव्हाण आर.ए.**
(इतिहास विभाग), महिला महाविद्यालय, गेवराई

---

**प्रस्तावना :**

महाराष्ट्रात 17 व्या शतकात भोसले घराण्याचा राजघराणे व राजसत्ता म्हणून उदय झाला. त्यात शहाजी भोसले यांच्या नंतर अनेक कर्तबगार पुरुष निर्माण झाले. तशा अनेक कर्तबगार स्त्रियांही पुढे आल्या त्यात मालोजी राजे यांची पत्नी उमाबाई छत्रपती शिवाजी महाराजांची माता जीजाबाई व त्यांची परंपरा चलवणारी यशुबाई व महाराणी ताराबाई या त्यापैकी यशुबाई अग्रगण्य आहेत.

यशुबाईचे माहेर हे दाभोळ प्रांतातील शिर्के घराण्यातील 1665 मध्ये संभाजीराजे बरोबर विवाह झाला. शिवाजी महाराजांची पहिली सुन व राजमाता जीजाबाईची नातसून शिवाजी महाराज यांनी यशुबाईचे नाव राजसबाई असे ठेवले यशुबाई राजमात जीजाबाई सोबत त्यांच्या सहवासात व संस्कारात वाढली. मराठ्यांच्या इतिहासात ज्याप्रमाणे शिवाजी महाराजाबरोबर स्वराज्य निर्माण करण्यासाठी मावळे लढले. त्याच प्रमाणे स्त्रियांनी सुध्दा लढा देवून संघर्ष केला. त्यात यशुबाईची महत्वाची भूमिका आहे. 01 फेब्रुवारी 1689 रोजी शेख निजामाने छत्रपती संभाजी महाराजांना संगमेश्वर येथे अटक केली त्यावेळी यशुबाई राजगडावर होत्या ही बातमी कळताच त्यांच्यावर आकाश कोसळले आलेल्या संकटाला धैर्याने तोंड देणे आवश्यक आहे. राजगडावरील सर्व मुत्सध्याशी विचार विनिमय केला त्यात महाराजांचे साथीदार येसाजी कंक व रायगडचा किल्लेदार चांगोजी काटकर यांनी यशुबाईला सहाय्य केले. याच दरम्यान 12 फेब्रुवारी 1689 रोजी राजारामाला छत्रपती पदावर बसविण्यात आले.[1]

औरंगजेबने संभाजीला झुकण्यास भाग पाडण्याचा प्रयत्न केला परंतु सिंहाच्या छाव्याने औरंगजेबपुढे झुकण्यास नाकार दिला. शेवटी 11 मार्च 1689 रोजी औरंगजेबाने संभाजीला वढु कोरेगाव येथे ठार मारले. यशुबाई व बालशाहूला कैद केले. बराच काळ गेल्यानंतर 20 फेब्रुवारी 1707 औरंगजेब बादशाहाचा मृत्यु झाला. सत्तेसाठी त्यांच्या मुलात संघर्ष झाला यांच दरम्यान 8 मे 1707 रोजी शाहूमहाराजांची सुटका झाली परंतु यशुबाईची झाली नाही शाहूमहराजांची सुटका आणि स्वराज्याचा हक्कदार कोण यातून महाराणी ताराबाई शाहू संघर्षाला सुरुवात झाली.[2]

औरंगजेबच्या कैदेत असतांना शाहू राजमाता यशुबाई इतर मराठे सरदार मंडळी यांची मनः स्थिती अतिशय चमत्कारीक असल्यास काहीच नवल नाही. छावणीतील भविष्य सुखावह नव्हते याबाबतीत राजमाता यशुबाईने 1705 मध्ये चिंचवडच्या मोरया देवाना जे पत्र लिहिले आहे त्यावरुन त्यांच्या दारुण स्थितीची कल्पना येते. साहुकाराचे पांच सात सहस्त्र ब्रम्हस्व झाले आता कोनी देत नाही मागल्यास पैक्यास तगादे लाविले आहेत, त्यांच्यामुळे बहुत कष्टी होतो. तो दु:खसागर स्वामीस काय म्हणून ल्याहावा.[3]

रायगडाच्या पाडावानंतर यशुबाई 40 वर्षे मोगलांच्या कैदेत राहिल्या त्याआधी छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची उभारणी करत असताना युवराज व यशुबाईला पहिली युवराज्ञी म्हणून राजघराण्यात स्थान प्राप्त झाले. यशुबाईचे दोन कठीन प्रसंग औरंगजेबच्या कैदेतून शिवरायांनी स्वतः ची सुटका करुन घेतली होती. बालसंभाजी यावेळी उत्तरेकडे मागे राहिले हा पहिला प्रसंग व दुसरा आपल्या पित्यावर पारखे घेवून संभाजी मोगल सरदार दिलेरखानाच्या गोटात जावून मिळाले हा प्रसंग मोठा होता. त्या ठिकाणी 29 जाने 1679 रोजी शृंगारपुरात त्यांना कन्या झाली तीचे नाव भवानीबाई असे ठेवले. संभाजी महाराजांना चुक लक्षात आली पुन्हा पन्हाळगडावर येवून दाखल झाले पिता-पुत्राची भेट झाली.[4]

15 मार्च 1680 रोजी राजारामाचा विवाह जानकीबाई सोबत झाला व 3 एप्रिल 1680 रोजी छत्रपती शिवाजी महाराज स्वर्गवास झाले. स्वराज्यात संभाजीला कैद करण्याचे कारस्थान झाले ते त्यांनी मोडून काडले. 18 जून 1680 रोजी संभाजी महाराज सैन्यसह राजगडावर आले. 16 जानेवारी 1681 ला राज्याभिषेक करुन घेतला. त्यावेळी यशुबाईचे वास्तव्य राजगडावरच होते. संभाजीवर विषप्रयोग त्या कटात बाळाजी आवजी होते त्यामुळे त्यांना ठार मारण्यात आले. त्यांचा पुत्र खंडे बल्लाळला राज्याच्या सेवेत घेण्यासाठी यशुबाईचा पुढाकार दिसतो. या घटनेसंदर्भात संभाजी व यशुबाई संवाद "यशुबाईसाहेब बोलली बाळाजी प्रभु मारीले हे उचित न केले बहुता दिवसाचे आणि इतबारी व पोख्त थोरले महाराज कृपाळु"[5] राज्यकारभार करण्यात यशुबाई जीजाबाई प्रमाणे होत्या. कारभाराचा अधिकार देताना "श्री सखीराज्ञी जयति" अशा शिक्का प्रधान केला होता. छत्रपती संभाजी मोहिमेवर असताना घेतलेला निर्णय यशुबाईचे एकपत्र चाफळ येथील श्रीरामाची यात्रा शांततेत पार पाडावी गावागावात पत्र पाठवून यात्रेस बोलवून सन्मान करणे अपनाकडून व सैन्याकडून कोणास त्रास होणार नाही यावरुन राजकारभारचे उदा.दिसते त्याच बरोबर देवस्थानावर श्रध्दा होती.[6]

संभाजी महाराज जेव्हा विविध मोहिमेवर असताना यशुबाईने राज्यकारभार चांगला संभाळला असे म्हणता येते याचे उदा. 22 जुलै 1683 मध्ये मराठ्यांनी रेवदंड किल्ल्यावर स्वारी केली पण तो पोतुर्गीजांनी उधळून लावला यादरम्यान यशुबाईने आपल्या नावे कारभार चालविलेला आहे.[7] यानंतर शाहूमहाराज आणि महाराणी ताराबाई संघर्षाला सुरुवात त्यात शाहू समोर पहिला प्रश्न होता तो राजमाता यशुबाईची सुटका करणे त्यासाठी शाहूमहाराजांकडे तेवढे सामर्थ्य निर्माण झाले नव्हते त्यासाठी शाहूला राजकीय संधी मिळणे गरजेचे होते. अशी संधी 1718 मध्ये शाहूकडे चालुन आली. मोगलसत्तेत सत्तेसाठी संघर्ष चालु असतांना फरुखसियर व सय्यद हुसेनचा संघर्ष हुसेनने मराठ्यांचे सहकार्य घेवून दिल्लीवर स्वारी करण्याचे ठरले हे शाहूने मान्य केले परंतु काही अटीच्या आधारे त्यामध्ये स्वराज्याची चौथाई व

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN: 2348-7143
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452, (GIF) - 0.676 | 12 January 2019 | UGC Approved No. 40705
Special Issue 92 , भारतीय इतिहासातील स्त्रियांचे योगदान

सरदेशमुखी व राजमाता यशुबाईंची कैदेतून सुटका हा अटी होत्या त्या सय्यद हुसेनने मान्य केल्या आणि पंधरा हजार सैन्य हुसेनच्या मदतीला बाळाजी विश्वनाथाच्या नेतृत्वाखाली पाठविण्यात आले त्यांना सहाय्यक म्हणून खंडेराव दाभाडे ही होते.

1710 मध्ये नव्या बादशाहाकडून सरदेशमुखी व चौथाई सरदेशमुखीच्या सनदासह यशुबाईंची सुटका झाली 1719 मध्ये यशुबाई साताऱ्याला येवून पोहोचल्या. शाहू व ताराबाई संघर्ष संपुष्टात आणण्यासाठी राजबंधूना समजोता घेवून प्रेमाने संबंध प्रस्थापित होण्यासाठी यशुबाईने पुढाकार घेतलेला दिसतो. त्या विषयी करवीर संभाजीराजे लिहितात "तीर्थरूप मातोश्री वडिलांच्या मसलेना अर्थ व उभयतांशी स्नेहाची दृढता होवून विवेक व्हावा म्हणून वडिलांचा विनंतीपत्र लिहिला. परस्पर विवेक होवून लोकोत्तर उभयतांशी निर्दोष व्हावी हेच आमचे असत्य आहे. पुढे उभय राजबंधून मसलतखानात पडून असता 13 एप्रिल 1731 रोजी शाहू व करवीर संभाजीराजे वारणेनानद झाला. त्यांच्या वाटाघाटी चालू असतानाच यशुबाई स्वर्गवासी झाल्या. या प्रमाणे यशुबाईंना कार्यांना पर्व आहे.

**सारांश :**

मराठ्यांच्या इतिहासात यशुबाईचे स्थान मोठे महत्त्वाचे आहे. प्रत्येक संकटावर मात करून राजकारभार केला. त्या त्या प्रसंगी दाखविलेला 40 वर्षे भोगल्याच्या कैदेत राहूनही स्वराज्याची निष्ठा विचारातील आचारातील संस्कार आबाधीत ठेवून महाराष्ट्र धर्मनिष्ठा संकटकालीन विचलीत न होता प्रतिकूल परिस्थितीशी सामना करण्याची साहसीवृत्ती आशावादी प्रवृत्ती असे गुण कार्यात नजिरान दिसून येते.

संदर्भ सूची :

1. पाडोळकर मदन, मराठ्यांचा इतिहास, विद्या प्रकाशन औरंगाबाद, प्रथम आवृत्ती, जुन 2008, पृ.क्र.194.
2. खरे ग.ह. आणि कुलकर्णी अ.रा. (संपा), मराठ्यांचा इतिहास खंड तिसरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती 1986, पृ.क्र.354.
3. कुलकर्णी अ.रा. आणि खरे ग.ह. (संपा), मराठ्यांचा इतिहास खंड दुसरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती, 1984 पृ.क्र.128.
4. पवार जयसिंगराव, संभाजी स्मारक- ग्रंथ, मंजुश्री प्रकाशन, कोल्हापूर प्रथम आवृत्ती मार्च 1990 पृ.क्र. 312.
5. उपरोक्त, पृ.क्र. 313.
6. उपरोक्त, पृ.क्र. 314.
7. पिसुर्लेकर पांडुरंग सखाराम, पोर्तुगीज-मराठे संबंध, पुणे विद्यापीठ, मे 1967, पृ.क्र.93.
8. पवार जयसिंगराव, संभाजी स्मारक- ग्रंथ, मंजुश्री प्रकाशन कोल्हापूर, प्रथम आवृत्ती, मार्च 1990 पृ.क्र.319.
9. सरदेसाई गोविंद सखाराम, मराठी रियासत, पुणे, 29 एप्रिल 1942, पृ.क्र.169.

Professor
J.B.S.P.Mandal's
Mahila Mahavidyalaya, Tq.Gevrai, Dist. Beed.